क्र. महानिर्मिती/महाव्यवस्थापक(मा.सं.)/ 5909

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
**महानिर्मिती नोंदणी,**
प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पुर्व),
मुंबई - ४०० ०५१
दिनांक :

23 APR 2009

**कार्यालयीन आदेश :**

कार्यकारी संचालक(सांघिक नियोजन) मुख्यालयाचे पद नागपूर येथे हलविण्यात येऊन त्यांचे कार्यकारी संचालक(नि. सं व सु)-II असे नामाभिधान करण्यात आले. या पदाचे कर्तव्ये व कार्यक्षेत्र तसेच कार्यकारी संचालक(नि. सं व सु-१) मुंबई यांची त्याअनुषंगाने कर्तव्ये, जबाबदारी व कार्यक्षेत्र खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

## (१) कार्यकारी संचालक(नि. सं व सु)-I मुख्यालय, मुंबई.

परळी, नाशिक येथील औ.वि.केंद्र, उरण वायु विद्युत केंद्र व सर्व जल विद्युत केंद्रे या वरील सर्वसाधारण पर्यवेक्षण आणि त्यांचे संचलन आणि अनुरक्षण कार्यकारी संचालकांच्या अखत्यारित येईल. या क्षेत्रातील नवीन प्रकल्पांचे कमिशनींग, संचलन व अनुरक्षण हे देखील कार्यकारी संचालक, मुख्यालय यांच्या अखत्यारित राहिल. संचलन व अनुरक्षणाशी संबंधित असलेले विभाग जसे भांडार, इंधन व्यवस्थापन, इंधन उपलब्धता, पर्यावरण व सुरक्षा, वर्क्स, स्थापत्य(III) इत्यादी त्यांच्या नियंत्रणाखाली असतील. प्रशासकीय व वित्तीय बाबीं करिता प्रदान केलेले अधिकार त्यांच्या अंतर्गत येणारी कार्यालये व विद्युत केंद्रात वापरात येईल. या शिवाय संचालक(संचलन), संचालक(वित्त) व व्यवस्थापकीय संचालकांनी नेमून दिलेली इतर कामे देखील करावी लागतील.

## (२) कार्यकारी संचालक(नि. सं व सु.)-II, नागपूर

विर्दभातील खापरखेडा, चंद्रपूर, कोराडी, पारस व भुसावळ या औष्णिक विद्युत केंद्राचे सर्वसाधारण संचलन व अनुरक्षण विषयक कामाच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी कार्यकारी संचालकांची राहिल. त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नवीन प्रकल्पांचे कमिशनिंग, संचलन व अनुरक्षणाची कामे त्यांच्या अखत्यारित येतील. औष्णिक विद्युत केंद्र व कार्यालयाकरिताच्या प्रशासकीय व वित्तीय कामकाजासाठी त्यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार वापरता येतील. या शिवाय इंधन व्यवस्थापन व इंधन उपलब्धता याच्या सार्वत्रिक समन्वयासाठी हे जबाबदार राहतील.

(३) बदली, पदोन्नती विषयक अधिकार पुर्वी प्रमाणेच मुख्यालयास राहिल. कार्यकारी संचालकांच्या अखत्यारित येणाऱ्या कर्मचाऱ्याच्या अनुषंगाने केलेले प्रस्ताव विचारात घेण्यात येतील. तथापि कार्यकारी संचालकांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिणे, स्विकृत करणे तसेच शिस्तभंग विषयक अधिकारी म्हणून काम करतील.

## (४) प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर

(अ) सर्व विद्युत केंद्रासाठी मुख्यालयातील सांघिक खेरदी विभागाकडून पुर्वी प्रमाणे खरेदी करण्यात येईल. अशा खरेदी करिता संबंधित कार्यकारी संचालक(नि. सं व सु.) यांनी शिफारस करणे आवश्यक राहिल, त्यांच्या शिफारशी विचारात घेवून मुख्यालयाने त्या प्रकरणी पुढील कार्यवाही करावयाची आहे.

(ब) कार्यकारी संचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने त्यांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार राहतील.

(क) कार्यकारी संचालक(नि. सं व सु.)-II नागपूर यांच्या मुख्यालयाशी संबंधित असलेल्या इतर बार्बीचा समन्वय व कार्यवाही मुख्य महाव्यवस्थापक(वर्क्स) मुख्यालय, मुंबई हे करतील. मुख्य महाव्यवस्थापक(वर्क्स) यांच्याकडे या पुर्वी असलेल्या कामा शिवाय ते ही अतिरिक्त कामे करतील.

हा कार्यालयीन आदेश कार्यकारी संचालक(मा.सं.) यांच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

23/7/09

**महाव्यवस्थापक(मा.सं)**

प्रति,
प्रेषण यादीप्रमाणे (कार्यकारी अभियंता पर्यंत)